20 NOV 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामर्थ्यशाली भारताचे स्वप्न राजर्षींच्या विचारात

## कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के : शाहू महाराजांच्या योगदानावरील आंतरराष्ट्रीय परिषदेची सांगता

**प्रतिनिधी**
कोल्हापूर



**कोल्हापूर : न्यू कॉलेज आयोजित 'राजर्षी शाहू छत्रपती : दृष्टिकोन, योगदान व समकालीन प्रस्तुतता' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपात बोलताना कुलगुरु प्रा. डॉ. दिगंबर शिर्के. सोबत डॉ. रमेश जाधव, बी. जी. बोराडे, के. जी. पाटील, डी. जी. किल्लेदार, डॉ. व्ही. एम. पाटील व डॉ. अर्चना कांबळे.**

राजर्षी शाहू महाराजांनी स्वातंत्र्य, समानता, बंधुभाव, मानवता व अपृश्यता निवारण या मुल्यांचा आयुष्यभर पुरस्कार केला. तशी विचारधाराही समाजात रुजवून त्यादृष्टीने जीवन जगण्याचा जनतेला कानमंत्रही दिला. लोककल्याणाचा विचार करतानाच त्यांनी 'बहूजन हिताय – बहूजन सुखाय' ही तत्वप्रणाली अंगीकारुन शिक्षणाबरोबरच विविध क्षेत्रात विकासाचा पाया घातला. आज आपण जे सामर्थ्यशाली भारताचे स्वप्न पाहत आहोत, ते राजर्षींच्या उद्यमशील कृती व विचारांमध्ये दडले आहे, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज येथे केले.

राजर्षी शाहू महाराज स्मृति–शताब्दी कृतज्ञता पर्वनिमित्त न्यू कॉलेजच्या वतीने आयोजित केलेल्या 'राजर्षी शाहू छत्रपती : दृष्टिकोन, योगदान व समकालीन प्रस्तुतता' या विषयावर आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपात ते बोलत होते. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या हॉलमध्ये दोन दिवस सुरु राहिलेल्या या परिषदेत राजर्षींनी केलेल्या बहुमोल कार्यावर विविध स्थानिक संशोधक, अभ्यासक, प्राध्यापक, विद्यार्थी वर्गासह देश–विदेशातील संशोधकांनी विचारमंथन केले. याचबरोबर ३० ते ३५ अभ्यासकांनी राजर्षींच्या कार्यावर तयार केलेले शोधनिबंधसुद्धा सादर केले.

डॉ. शिर्के म्हणाले, लोकराजा राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा वारसा आणि वसा घेऊन शिवाजी विद्यापीठाची वाटचाल करत आहे. भविष्यातही तशीच वाटचाल सुरु राहिल यात शंकाच नाही. राष्ट्रांच्या उभारणीकडे डोळसपणे पाहिले तर राजर्षी शाहूंनी केलेले कार्य कुठेपर्यंत पोहोचले आहे, याची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही. कोल्हापुरात राजर्षींनी पेरलेली पुरोगामी विचारधार तर आज संपूर्ण महाराष्ट्रात रुजली याचा अभिमान वाटतो. हाच पुरोगामित्वाचा विचार आजच्या नव्या पिढीला निश्चित ऊर्जा देत राहिल.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव म्हणाले, शाहू महाराजांनी सर्वच क्षेत्रांना राजाश्रय देऊन त्याला प्रगतीची दिशा दिली. त्यांनी केलेल्या या बहुमोल कार्याचा जागर होण्यासाठी सातत्याने परिषदांचे आयोजन करण्याची आवश्यकता आहे. आजच्या आधुनिक काळातील नव्या पिढीसमोर राजर्षी शाहूंच्या कार्याचा उलगडा केला तर ही पिढी स्वातंत्र्य, समानता, बंधुभाव, मानवता अंगिकारुन त्या दृष्टीने कृतीशील बनेल. यावेळी श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे अध्यक्ष बी. जी. बोराडे, के. जी. पाटील, डी. जी. किल्लेदार, संचालक आर. डी. पाटील, सविता पाटील, वाय. एस. चव्हाण, उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख उपस्थित होते. प्राचार्य व्ही. एम. पाटील यांनी स्वागत केले. परिषदेच्या समन्वयक डॉ. अर्चना कांबळे यांनी आभार मानले.

सकाळ



कोल्हापूर : न्यू कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डॉ. रमेश जाधव, बी. जी. बोराडे, के. जी. पाटील, डी. जी. किल्लेदार, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. अर्चना कांबळे.

# राष्ट्रउभारणीत राजर्षी शाहूंचे उद्यमशील कार्य देदीप्यमान

## डॉ. शिर्के : न्यू कॉलेजमधील परिषदेचा समारोप

कोल्हापूर, ता. १९ : 'राजर्षी शाहू महाराजांच्या कृतिशील कार्यामध्ये स्वातंत्र्य, समानता, बंधूभाव, मानवता या मूल्यांचा पुरस्कार करणारी प्रागतिक विचारधारा आहे. लोककल्याणकारी प्रजाहितौषी 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' ही तत्त्वप्रणाली आहे. त्यांच्या पुरोगामी विचारधारेत सामाजिक बांधिलकी आणि ऐक्याचे सुराज्य उभा करण्याचे सामर्थ्य होते,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

न्यू कॉलेजमध्ये आयोजित 'राजर्षी शाहू छत्रपती : दृष्टिकोन, योगदान व समकालीन प्रस्तुतता' यावर दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप झाला. यावेळी ते बोलत होते. डॉ. शिर्के म्हणाले, ''शिवाजी विद्यापीठाची वाटचाल ही राजर्षी शाहूंच्या विचारांचा वसा, वारसा घेऊन होत आहे. राष्ट्रउभारणीत राजर्षी शाहूंचे उद्यमशील कार्य देदीप्यमानं आहे. पुरोगामी महाराष्ट्राचे ते ऐतिहासिक संचित आहे. नव्या पिढीला निश्चितच ते ऊर्जा देणारे आहे. भारतीय लोकशाही समाजव्यवस्थेमध्ये आदर्शवत आहे.''

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव म्हणाले, ''राजर्षी शाहू महराजांनी कला, क्रीडा, शिक्षण, साहित्य, व्यापार, उद्योग अशा जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये योगदान दिले. शाहूंच्या विचारांचा जागर होण्यासाठी अशाप्रकारच्या परिषदांची आवश्यकता आहे.''

प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी स्वागत केले. यावेळी श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे अध्यक्ष बी. जी. बोराडे, चेअरमन के. जी. पाटील, उपाध्यक्ष डी. जी. किल्लेदार, संचालक आर. डी. पाटील, श्रीमती सविता पाटील, वाय. एस. चव्हाण, संस्थेचे आजीव सेवक आणि उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख, विविध शाखाप्रमुख, प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. परिषदेच्या समन्वयक डॉ. अर्चना कांबळे यांनी आभार मानले.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात इंदिरा गांधी जयंती

**कोल्हापूर, ता. १९ :** शिवाजी विद्यापीठात आज माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन झाले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम झाला.

यावेळी अहिंसा व एकतेची शपथ घेण्यात आली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. आर. बी. पाटील आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठात इंदिरा गांधी जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अहिंसा व एकतेची शपथ घेण्यात आली. या प्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. एस. एन. सपली, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. आर. बी. पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 NOV 2022


महासत्ता

# विद्यापीठ सिनेट निवडणुकीत विकास आघाडीची बाजी

कोल्हापूर,ता.१८(प्रतिनिधी)-

**शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या सिनेट निवडणुकीत विद्यापीठ विकास आघाडीने बाजी मारली.**

विद्यापरिषदेवर 'विज्ञान व तंत्रज्ञान शाखेच्या खुल्या जागेवर राजेश निमट यांची निवड झाली तर मानव्यविद्या शाखेतील खुल्या जागेवर पोपट पाटील यांची तर अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या जागेवर सुनिल बनसोडे तसेच आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या खुल्या जागेवर सुनिल चव्हाण यांची निवड झाली. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या जागेवर जगदीश सपकाळे यांची तर वाणिज्य विद्याशाखेच्या महिला प्रवर्गाच्या जागेवर वर्षा मैंदर्गी यांची बिनविरोध निवड झाली. अधिसभेच्या खुल्या प्रवर्गाच्या पाच जागांसाठी अत्यंत चुरशीच्या झालेल्या या



निवडीमध्ये दत्तात्रय पाटील, रघुनाथ ढमकले, प्रशांत खरात, मनोज गुजर आणि निवासराव वरेकर हे निवडून आले.

भटक्या व विमुक्त प्रवर्गाच्या जागेवर ज्ञानदेव काळे,अनुसूचित जाती प्रवर्गाच्या राखीव जागेवर बबन सातपुते आणि इतर मागास प्रवर्गाच्या जागेवर प्रकाश कुंभार हे थेट लढतीत विजयी झाले.

नोंदणीकृत पदवीधरांची मतमोजणी मात्र दुसऱ्या दिवशी पहाटे सुरू झाली. त्यामध्ये इतर मागास प्रवर्गाच्या जागेवर अभिषेक मिठारी, अनुसूचित जातीच्या जागेवर रतन कांबळे आणि भटक्या व विमुक्त प्रवर्गाच्या जागेवर अमरसिंग राजपूत हे विजयी झाले.

नोंदणीकृत खुल्या प्रवर्गाच्या मतांची मोजणी दि.१७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी उशिरापर्यंत सुरू होती. त्यामध्ये विष्णू खाडे यांनी सर्वप्रथम कोटा पूर्ण केल्यानंतर अमित जाधव यांनी आवश्यक मतांचा कोटा पूर्ण केला. उर्वरित ३ जागांवरील निवडीसाठी मतमोजणी सायंकाळी सातपर्यंत सुरू होती. अखेर सात वाजता निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निकाल जाहीर केला. त्यानुसार विष्णू खाडे, अमित जाधव,श्वेता परूळेकर, अजित पाटील आणि स्वागत परूळेकर हे निवडून आले.

अधिसभेवर निवडून द्यावयाच्या अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या शिक्षक जागेवर शिवाजी बोथीकर तर महिलांसाठी राखीव जागेवर शाहीन पटेल या बिनविरोध निवडून आलेल्या आहेत. नोंदणीकृत प्रदवीधरांच्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील लोभाजी भिसे आणि महिला प्रवर्गातील उषा पवार या बिनविरोध निवडून आलेल्या आहेत.

संस्था चालक आणि प्राचार्य प्रवर्गातून एकाही पदाची निवडणूक झालेली नाही. सर्व सदस्य बिनविरोध निवडून आले. यामध्ये अरूण पाटील, सर्जेराव पाटील, बसंत पाटील, बापूसाहेब सावंत, सुर्यकांत केंगार, राजेंद्र शेजवळ आणि तेजस्वती मुढेकर यांची बिनविरोध निवड झाली तर अनुसूचित जमाती आणि भटक्या व विमुक्त प्रवर्गाच्या जागा रिक्त राहिल्या. त्याचप्रमाणे, अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सहा जागातील खुल्या प्रवर्गाच्या चार जागांवर अमित कुलकर्णी, प्रकाश पाटील, पृथ्वीराज पाटील, वैभव पाटील यांची निवड झाली. तर महिलांसाठी राखीव जागेवर मंजिरी मोरे यांची निवड झाली. अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव असणाऱ्या जागा रिक्त राहिल्या आहेत.

पुढारी

# प्रवेश, परीक्षा आणि निकाल यामध्ये सुसूत्रता आणणार

## विद्यापीठ विकास मंचचा संकल्प

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीत शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीअंतर्गत विद्यापीठ विकास मंचचे पाच सदस्य निवडून आले आहेत. हे सदस्य विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टिकोनातून काम करतील, विद्यापीठातील प्रवेश प्रक्रिया, परीक्षा आणि त्यानंतर लागणारे निकाल यामध्ये सुलभता आणि सुसूत्रता यावी, यासाठी प्रयत्न केले जातील, अशी माहिती अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे निवडणूक विभागप्रमुख केशव गोवेकर यांनी पत्रकार बैठकीत दिली.

गेली सतरा वर्षे मंच आणि विकास आघाडी एकत्र येऊन काम करत आहे. विद्यापीठाच्या निवडणुकीत पदवीधर गटातून ॲड. स्वागत परुळेकर, रतन कांबळे, डॉ. उषा पवार, लोभाजी भिसे व संस्था गटातून अमित कुलकर्णी निवडून आले आहेत. गेल्या पाच वर्षे अधिसभेत विकास मंचच्या सदस्यांनी विविध प्रश्नांवर भूमिका मांडली. विद्यापीठ प्रशासनाने ती स्वीकारली. त्यामुळे संशोधनासाठी दिल्या जाणाऱ्या निधीमध्ये वाढ झाली. खेळाडूंना अतिरिक्त मानधन मिळत आहे. अशा अनेक गोष्टी विकास मंचच्या माध्यमातून केल्या आहेत. यापुढे प्रवेश, परीक्षा आणि निकालात सुसूत्रता आणण्यासाठी मंचचा प्रयत्न राहील, तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची पारदर्शकपणे अंमलबजावणी करणे, रोजगाराभिमुख शिक्षण, शिकाऊ उमेदवारी व निवड योजनेच्या विकासाला गती देणे, प्राध्यापक भरती करून शैक्षणिक व्यवस्था मजबूत करणे, विद्यार्थी निवडणुका खुल्या पद्धतीने घेण्याचे सुरू करणे, संशोधनासाठी अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे आदी मुद्द्यावर भर दिला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

पत्रकार बैठकीस दिग्विजय गरड, दिनेश हुमानाबादे, स्वप्निल पाटील, गौरव ससे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 NOV 2022
सकाळ

# प्रवेश, परीक्षा, निकालात सुसूत्रता आणणार

## विद्यापीठ विकास मंचचा संकल्प

**सकाळ वृत्तसेवा**

**कोल्हापूर, ता. १९ :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीत विद्यापीठ विकास आघाडीअंतर्गत विद्यापीठ विकास मंचचे चार सदस्य निवडून आले. हे चार अधिसभा सदस्य आघाडीच्या अन्य सदस्यांबरोबर समन्वय ठेवून विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टिकोनातून काम करतील. प्रवेशप्रक्रिया, परीक्षा आणि निकाल यामध्ये सुसूत्रता यावी. विद्यार्थ्यांना मनस्ताप होऊ नये, यासाठी विद्यापीठ विकास मंचचे अधिसभा सदस्य प्राधान्याने काम करतील, अशी माहिती विद्यापीठ विकास मंचने पत्रकाद्वारे दिली.

पत्रकातील माहितीनुसार, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या पूर्व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन विद्यापीठ विकास मंचची स्थापना केली. याच नावाने राज्यातील सर्व विद्यापीठात विद्यार्थीहिताचे काम केले जाते. १७ वर्षे विद्यापीठ विकास मंच आणि विद्यापीठ विकास आघाडी एकत्र येऊन विद्यापीठात काम करतात. पाच वर्षांत अधिसभेत विकासमंचच्या सदस्यांनी विविध प्रश्नांवर भूमिका मांडली. विद्यापीठ प्रशासनाने ती स्वीकारली. त्यामुळे संशोधनासाठी दिल्या जाणाऱ्या निधीमध्ये वाढ झाली. खेळाडूंना अतिरिक्त गुण मिळाले. खेळाडू, कलाकार विद्यार्थ्यांचा विमा काढला गेला. नुकत्याच निवडणुकीत विद्यापीठ विकास मंचचे अमित कुलकर्णी, ॲड. स्वागत परुळेकर, रतन कांबळे, डॉ. उषा पवार, लोभाजी भिसे हे पाचजण अधिसभेवर निवडून गेले. विद्यापीठातील प्रवेश सुलभ व्हावेत. परीक्षा पारदर्शक आणि संभ्रमाविना असाव्यात. निकाल बिनचूक आणि निश्चित कालावधीत लागतील; यासाठी विद्यापीठ विकासमंच पाठपुरावा करेल. नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी योग्य होण्यासाठी कटिबद्ध आहोत, असे पत्रकात म्हटले आहे.

### दृष्टिक्षेपात संकल्प

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण पारदर्शी अंमलासाठी कटिबद्ध.
- रोजगाराभिमुख शिक्षण, शिकाऊ उमेदवारी व विकासाला गती.
- अद्ययावत सुविधेद्वारे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाडूंसाठी वातावरण रुजवणे.
- विद्यापीठात प्राध्यापक भरती करून शैक्षणिक व्यवस्था मजबूत करणे
- विद्यार्थी निवडणुका सुरू करून पारदर्शकतेसाठी प्रयत्न.
- उद्योग - शेतीपूरक नवनवीन आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम उपलब्ध करून देणार
- स्टार्टअपसाठी कार्यक्रम घेऊन, युवकांना उद्योग व्यवसायात संधीसाठी प्रयत्न